# जिल्हा नियोजन समिती अंतर्गत योजनांचा मागील तीन वर्षाचा संक्षिप्त प्रगती आढावा 2009-10 ते 2011-2012

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती तर्फे राबविण्यात येणा-या निरनिराळया योजनांपैकी सूरवातीस दिलेल्या सहा योजनांचे मुल्यमापन करण्यासंबधीचे आदेश वरील कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतर या सहा योजनांच्या मागील तीन वर्षासंबधी योजनांचे आर्थिक व भौतिक उदिष्ट साध्य जिल्हास्तरीय संदर्भीय माहिती संबधीत विभागा तर्फे संकलीत केली त्या संदर्भाचे निष्कर्ष योजना निहाय संक्षिप्त टिप्पणी खालील प्रमाणे आहे.

## १)डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

मागील तीन वर्षातील एकूण पीक कर्ज व्याज सवलत योजने अंतर्गत 2011 पासून रु.50,000 ते 1 लाख पीक कर्जासाठी व्याज अनुदान मुददलाच्या 3 टक्के तर 1 ते 3 लाख रुपये पीक कर्जासाठी 2 टक्के वार्षिक व्याज सवलत दिलेली आहे. या कार्यक्रमा अंतर्गत मागील तीन वर्षात असे निदर्शनास येते की खरीप हंगामात 70 ते 80 टक्के तर रब्बी हंगामात 20 ते 30 टक्के पीक कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. साधारणपणे मागील 3 वर्षातील एकूण कर्ज रक्कम रुपये 1532 कोटी पीक कर्ज वाटपा पैकी 941 कोटी रु. (61 टक्के) पीक कर्ज वाणिज्य बँकेने दिले आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके तर्फे 364 कोटी (24 टक्के) तर मराठवाडा ग्रामीण बँक मार्फत फक्त 227 कोटी रु. (15 टक्के) पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.

मागील तीन वर्षामध्ये सरासरी पिक कर्ज वाटपामध्ये दरवर्षी वाढ झाल्याचे निदर्शनास येते. 2009 ते 2010 मध्ये 12525 रुपये पीक कर्ज वाटप झाले. तर 2010 ते 2011 मध्ये 22914 रुपये सरासरी पीक कर्ज वाटप करण्यात आले. तर यात सुधारणा होऊन 2011- 2012 मध्ये सरासरी 33741 रुपय पीक कर्जात मोठी वाढ झाल्याचे निदर्शनास येते. या मध्ये वाणिज्य बँके मार्फत वितरीत करण्यात आलेल्या पीक

कर्जाची प्रती शेतकरी सरासरी रक्कम 49618 रु. पर्यंत पोहचलेली आहे. कदाचीत डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेमुळे ही वाढ झालेली असावी तरी परंतू नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे शेतकऱ्यांना सरासरी योग्य व आवश्यक पीक कर्ज प्राप्त झालेले नाही.

योजनेच्या अंमलबजावणी बाबत असे स्पष्ट जाणवते की पहिल्या दोन वर्षात मंजूर निधी पैकी फारच कमी खर्च करण्यात आला परंतू 2011 ते 2012 मध्ये मात्र मंजूर निधी पैकी सर्व निधी 100 टक्के खर्च करण्यात आला आहे. व एकूण 62340 लाभार्थींला कर्ज वाटप करण्यात आले या मध्ये सर्वात जास्त सभासद (9736) हादगाव तालूक्यातील असल्या कारणाने त्याना 42.70 लाख रु. (सर्वात जास्त) निधी वितरीत केला तर रु.10.00 लाखा पेक्षा कमी निधीचे कर्जवाटप नायगाव, हिमायतनगर, माहूर, नांदेड, धर्माबाद व उमरी या तालूक्यात झाले तसेच रु. 30.00 लाखापेक्षा जास्त वाटप देगलूर, मुखेड, कंधार, व लोहा या तालूक्यात झाले आहे. एकूण 62340 लाभार्थींचा विचार केला तर सरासरी कर्ज वाटप 48925 रु. येते.

## १)सुक्ष्मसिंचन योजना

ठिबक/ तुषार सुक्ष्मसिंचन योजनेचा मागील तीन वर्षाचा आढावा घेता असे दिसते की मंजूर निधी जरी कमी होता (516.96 लाख) तरी वितरीत निधी मात्र रु. 1453.69 लाख असून या निधी पैकी 1355.85 लाख रु (93 टक्के) खर्च झोलेला आहे व भौतिक उदिष्ट व साध्य ठिबक व तुषार साठी जवळपास 100 टक्के साध्य झालेले आहे. या एकत्रित खर्चामध्ये मात्र एकूण 14768.22 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले त्यामुळे त्याचा प्रति हेक्टरी खर्च 9181 रुपये झाल्याचे दिसून येते.

## २)इंदिरा आवास योजना

इंदिरा आवास योजनेच्या बाबतीत मागील तीन वर्षांचा एकत्रीत प्रगतीचा आढावा घेतला असता असे जाणवते की आर्थिक उदिष्टा पैकी फक्त 62 टक्के निधी रक्कम खर्च केल्या गेली परंतू भौतिक साध्य मात्र 95 टक्के झाल्याचे दर्शविण्यात येते याचाच अर्थ प्रती घरकुल मंजूर रकमेच्या प्रमाणा पेक्षा कमी निधीचे वाटप झालेले आहे किंवा घर बांधकाम अपूर्ण असून सुध्दा उदिष्ट पूर्ण  झाल्याचे दाखविण्यात आले आहे.

## ३)लघुपाटबंधारे योजना

लघुपाटबंधारे योजनेचा अहवाल सादर करतानां असे जाणवते की मंजुर निधी कमी असून ही प्राप्त निधी जास्त दाखविण्यात अलेला आहे. त्यामध्ये सुरवातीची शिल्लक रक्कम लक्षात घेऊन एकूण रु. 1508.65 लाख निधीची उपलब्धता लघुपाटबंधारे योजनासाठी केलेली होती परंतू या पैकी फक्त 58 टक्के निधी खर्च झालेला आहे. त्यामुळे लघुपाटबंधाऱ्याची कामाची गती अपेक्षीत प्रमाणात झालेली नाही.

योजनेचे भैतिक उदिष्ट व साध्य लक्षात घेता एकूण 127 कामा पैकी 118 कामे पूर्ण झाल्याचे (93 टक्के) दाखविण्यात येते. त्यामुळे या योजनेच्या संदर्भात सुध्दा प्रती बंधारा खर्च कमी असल्याचे निदर्शनास येते मंजूर झालेल्या कामाच्या क्षेत्रफळा संदर्भात विचार केला तरी ही 83 टक्के क्षेत्रफळ सिंचनासाठी उपयुक्त आहे असे जाणवते. एकूण 888.97 लाख रुपये खर्च करुन 118 बंधाऱ्यांचे काम पूर्ण झालेले आहे. व 274 हेक्टर क्षेत्रांचा सिंचनासाठी वापर सुरु झालेला आहे त्यामुळे प्रत्येक कामासाठी सरासरी 7.47 लाख रु हा खर्च आलेला आहे. तर प्रती हेक्टरी हा खर्च 3.62 लाख रु असा येतो याची नोंद घेणे आवश्यक आहे.

## ४)कोल्हापूर बंधारा

कोल्हापूर बंधारा या बाबतीमध्ये सुध्दा सिमेंट नाला बांधकामा सारखाच  अनुभव दिसुन येतो कारण मंजूर निधी कमी असून सुध्दा प्राप्त निधीत वाढ  झालेली आहे तरी परंतू प्रत्यक्षात एकूण 1353.11 लाख रु निधीची उपलब्धता मागील 3 वर्षात असून सुध्दा प्रत्यक्ष खर्च मात्र 43 टक्के (रु.580.79 लाख) झालेला आहे.

यातील गंमतीचा प्रकार म्हणजे एकूण मंजूर 68 कामापैकी 62 कामे (91 टक्के) पूर्ण झालेली आहे असे दर्शविलेले आहे. परंतू मंजूर झालेल्या कामातील 457 हेक्टर क्षेत्रफळाचे उदिष्ट असताना सुध्दा फक्त 28 टक्के क्षेत्रफळ पूर्ण झालेले दाखविण्यात आलेले आहे. त्यामुळे तेथे संभ्रमआवस्था निर्माण होते. एकतर प्रत्येक मंजूरी कामा मध्ये आर्थिक तरतूद जास्त दिसते परंतू प्रत्यक्षात मात्र खर्च कमी दिसतो त्यामुळे प्रती हेक्टर प्रमाणे खर्च जास्त दिसतो याची नोंद संबधीत यत्रंणेने घेणे आवश्यक आहे.

## ५)अंगणवाडी बांधकाम योजना

अंगणवाडी बांधकाम बाबत मागील तीन वर्षाची मंजूर रक्कम 2474.00 लाख रु होती परंतू वितरीत निधी मात्र मंजूर रक्कमे पेक्षा 16 टक्के जास्त (2871 लक्ष रु ) आहे तरी परंतू खर्चाचे प्रमाण मात्र उपलब्ध निधीच्या फक्त 34 टक्केच आहे व भौतिक उदिष्ट मात्र 22 टक्केच आहे त्यामुळे या कार्यक्रमाकडे अंगणवाडी बाधंकामा बाबत दूर्लक्ष होत आहे असे स्पष्टपणे जाणवते.

## ➢ निवडलेल्या लाभार्थींची पार्श्वभुमी-

१) जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड अंतर्गत निवड करण्यांत आलेल्या एकुण 6 योजने अंतर्गत नांदेड जिल्हयातील पाच तालुक्यातून 1352 लाभार्थीची निवड करण्यांत आली. यात सर्वात जास्त लाभार्थी (357) डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजने अंतर्गत निवडले तर कोल्हापुर बंधारे योजनांची कामे कमी असल्या कारणाणेच सर्वात कमी (40) लाभार्थींची निवड करण्यांत आली. या सहा योजना पैकी, पहिल्या पाच योजनांची मुलाखत पत्रके लाभार्थीशी संबधित असून फक्त अंगणवाडी बांधकाम योजने बाबतीतची माहीती संबंधीत अभियंता अथवा अंगणवाडी कार्यकर्ती किंवा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केलेली आहे. त्यामूळे संबधित कर्मचारी यांच्या तर्फे 72 अंगणवाडया बाबतीत माहिती घेतली. त्यामूळे लाभार्थींचे विश्लेषण करतांना अंगणवाडी लाभार्थी सोडून प्रत्यक्ष 1276 लाभार्थीचे विवेचन अहवालात केलेले आहे.

२) सुक्ष्मसिंचन योजना व इंदिरा आवास योजनेसाठी महिलांना योजनेत प्राधान्यक्रम द्यावा अशी अपेक्षा असतांना सुध्दा महिलांना आवश्यक तेवढे प्राधान्य दिलेले नाही. त्यामूळे या बाबतीत पुढील कार्यक्रमासाठी महिलांना प्राधान्यक्रम देणे गरजेचे आहे.

३) निरनिराळया सामाजिक स्तरातील अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीयांना योग्य ते प्राधंन्य योजनेत दिलेले आहे. किंबहुना इंदिरा आवास योजनेत सर्वात जास्त 81% अनुसूचित जाती /जमातीच्या लाभार्थ्यांना यामध्ये लाभ दिलेला आहे.

४) दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या सहभागाबद्दल असे म्हणता येईल की, इंदिरा आवास योजनेमध्ये अपेक्षितप्रमाणे 100% दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत. परंतु इतर योजनेत मात्र लाभार्थींचे तेवढे प्रमाण दिसून येत नाही. तसेच अल्प व अत्यल्प भू-धारकांचे प्रमाण सुध्दा 62% आहे. कदाचित सहापैकी चार योजना शेतीशी संबंधित असल्याने शेतक-यांचे प्रमाण जास्त आहे.

५) व्यवसाय निहाय लाभार्थ्यांचे वर्गीकरण करत असतांना सर्वात जास्त शेती व्यवसाय करणारे (68%) निवडल्या गेलेले आहेत. तर शेतमजूर व इतर मजूर लाभार्थीची टक्केवारी 26 % आहे योजनेच्या 82% लाभार्थ्यांचा समावेश आहे. अशा सर्व पाच योजनाचा समावेश करुन 22% लाभार्थी आहेत.

६) लाभार्थीच्या उत्पन्नांचा स्तर अभ्यासतांना असे प्रकर्षाने जावणते की, जवळपास 40% लाभार्थी हे दारिद्र्य रेषेच्या खालील आहेत. त्यांचे वार्षिक उत्पन्न 50,000/- च्या आत आहे. तसेच मध्यम गट (51,000 ते 1 लाख) उत्पन्नांतील व उच्च उत्पन्न गटातील एक ते तीन लाख किंवा तीन लाखापेक्षाही जास्त उत्पन्न असणारे श्रींमत लाभार्थी 31% आहेत.

७) सारांश लाभार्थीमध्ये पुरुषांचे प्रमाण जास्त आहे, सर्व सामाजिक स्तरातील लाभार्थीतना योग्य ते प्राधान्य दिलेले आहे. बहुतांश योजना शेतीशी निगडीत असल्याने, शेती व्यावसाय करणारे लाभार्थी जास्त आहे तर, 35 ते 40 टक्के लाभार्थी कमी उत्पन्न गटातील आहेत.

## 1) डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

१) या योजने अंतर्गत निवड झालेल्या लाभार्थीमध्ये अत्यल्प व अल्प भूधारकाची संख्या 1/3 (64%) आहे.

२) 40% शेतक-या पर्यंत पीक कर्ज योजना उशीरा पोंहचली आहे. त्यातही किनवट हा आदिवासी तालुका अग्रेसर आहे.

३) मागील वर्षी 68 टक्के शेतकऱ्यांना रु.25000/- च्या आत कर्ज भेटले. तर फ क्त 16% शेतकऱ्यांना रु. 50000/- पेक्षा जास्त कर्ज भेटले. त्यामुळे योजना जरी 3.00 लाख रुपयापर्यंत कर्ज मजूरीसाठी होती तरीही जवळपास 85% लोकांना रु 50000/- पेक्षा जास्त कर्ज मिळाले नाही. त्यामुळे सहकारी संस्था अथवा तालुका पातळीवरील संस्थाची मानसिकता शेतक-यांच्या आवश्यकते प्रमाणे कर्ज देण्याची नाही असे दिसून येते.

४) 2012 - 2013 या वर्षात 52% लाभार्थी शेतकऱ्यांनी रु 25000/- पर्यंत कर्ज मागणी केली पण 68% लाभार्थी शेतक-यांना या कक्षेत कर्ज दिले आहे. तसेच 19 % लाभार्थीने रु. 50000/- वर कर्ज मागणी करुनही फ क्त 13 % लोकानांच जास्तीच्या मागणीचे कर्ज मिळाले. त्यामुळे सर्वांना कर्ज जरी मिळाले तरी मागणी पेक्षा कमी कर्ज पूरवठा शेतकऱ्यांना होतोय या बाबत दखल घ्यावी लागेल. सर्व तालूक्याचा एकत्रीत विचार करता प्रत्येकी सरासरी रु 35824/- रुपयाची कर्ज मागणी रक्कम होती पंरतू प्रत्यक्ष 24867 रु चे कर्ज दिलेले आहे म्हणजेच 1/3 रक्कमेची शेतकऱ्यांना कमतरता कर्जाच्या माध्यामातून भासत राहीली.

५) 97% लाभार्थी शेतक-यांनी कर्ज रकमेची परतफेड ठराविक कालावधीत केली त्यामुळे हे सर्व लाभार्थी पूढील वर्षासाठी लाभ घेण्यास पात्र ठरले त्यामूळे वेळेवर व नियमित कर्ज परत फेडीेची सवय शेतकऱ्यांना लागत आहे असे जाणवते.

६) 61 टक्के लाभार्थींना नियमित व वेळेवर कर्जाचा भरणा केला त्यामुळे त्यांना जास्त व्याजाची रक्कम भरावी लागली नाही व त्यांना व्याज सवलत मिळाली आहे. त्यांची व्याजाची रक्कम वर्षभरात रु. 1000 /- पेक्षा कमीच होती. अर्थात ठराविक सभासदाना (25%) जास्तीच्या रक्कमेचे कर्ज दिल्यामुळे त्याना रु. 1500 पेक्षा जास्त कर्जाच्या व्याजाची रक्कम द्यावी लागली.

७) 81 % लाभार्थी शेतकऱ्यांना 1000 रु पर्यंत व्याज सवलत मिळाली. दोन व्यक्तींना व्याजसवलत मिळालीच नाही तर 4 व्यक्ती हे थकबाकीदार आहेत त्यामुळे त्याना पूढील कर्जाच्या संधी बाबत ते पात्र नाहीत.

**क्षेत्रिय पहाणीतील निरीक्षणे व शिफारशी-**

**अ) त्रुटी-**

**१) होनवडज-** सर्व शेतक-यांना पिक कर्जाचा लाभ मिळत नाही. गाव ग्रामीण बँकेने दत्तक घेतलेले आहे. दुसरी बँक कर्ज देत नाही. यावर उपाय काय? अशी लाभार्थींची प्रतिक्रिया आहे.

**२) कौठा-** व्याजाची रक्कम खात्यावर जमाच केली नाही. अधिका-यांचा हलगर्जीपणा आहे. तसेच चेअरमन पदाची आठ वर्षापासून निवडणुक झाली नाही. निवडणुक घ्यावी अथवा प्रशासक नेमावा असे लाभार्थींचे म्हणणे आहे.

३) हडसनी - सोसायटी चा मेंबर नाही तरीही चेअरमन पदी निवड केली गेली, या बाबीकडे बँकेने दुर्लक्ष केले आहे याचा विचार व्हावा.

**४) मुखेड- कमळेवाडी-** पिक कर्ज योजने अंतर्गत 12000 रुपये मी घेतले नाही. परस्पर रक्कम उचलुन ती भरुनही टाकण्यात आली. मात्र या बद्दल येथील लाभार्थींचे म्हणणे आहे की, मला याची काहीही माहिती नाही. सेक्रेटरी हे सर्व व्यवहार पहातात. रक्कम परस्पर उचलली गेली चौकशी व्हावी. तक्रारदार रावसाहेब लक्ष्मण हाके कमळेवाडी ता. मुखेड.

काही ठिकाणी संबधित कर्मचा-याकडे लाभार्थीच्या यादया नव्हत्या त्यामूळे तेथे पत्रके भरता आली नाही. त्यामुळे सर्व्हेक्षणामध्ये अडथळा निर्माण झाला होता.

**ब) अडचणी-**

सर्व सचिवांचे असे म्हणणे आहे की, पगार कधीच नियमित होत नाही.

1) नेहमी आर्थिक विवंचनेत राहावे लागते.

2) पिक कर्जाची रक्कम वाढवून मिळावी असे अनेक लाभार्थीचे म्हणणे आहे.

3) पिक कर्ज रक्कम मार्च- एप्रील महिण्यांत देण्यांत यावी.

4) नविन शेतकऱ्यांना सभासद करुन घ्यावेत. त्यांना पिक कर्ज मिळत नाही. आर्थिक अडचण येते.

5) पिक कर्जाची रक्कम सर्वच शेतक-यांना मिळावी. ग्रामीण बँकेने गांव दत्तक घेतले आहे. त्यामुळे इतर बँका कर्ज देत नाहीत. यावर पर्यायी व्यवस्था करावी. जेणेकरुन लाभार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही.

**क) योजनेच्या चांगल्या बाबी-**

1) ही योजना चांगली आहे. शेतक-यांच्या हिताची आहे. शासनाने यामध्ये सु-सुत्रता आणून योजना चालु ठेवावी.

2) बहुतांशी शेतकरी सचिव आणि त्यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून आहेत.

3) अपवादात्मक एखादया सचिवाबाबत तक्रार ऐकण्यात आली. बाकी सर्व सचिव सहकार्याने काम करतात.

4) सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी मुल्यमापन समितीस चांगले सहकार्य केले. (काही अपवाद वगळता)

### ड) शिफारशी

1) सर्व कर्मचारी व सचिवांचे पगार नियमित व्हावे त्यामूळे कामाला अधिक गती येईल.

2) पगार व इतर खर्चासाठी सहकार खात्याला अनुदान म्हणून रक्कम देण्यांची गरज आहे.

3) पिक कर्जाची रक्कम वाढवून मिळावी व वेळेवर शेतक-यांना रक्कम दिली जावी.व थकबाकी दारांना योग्य पध्दतीने समज देवून व वसुली वेळेत व्हावी

4) नविन सभासदांची नोंदणी करुन त्यांनाही पिक कर्ज योजनेचा लाभ मिळावा.

5) बोगस प्रकरणे होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

6) राष्ट्रीयकृत बँका व सहकार क्षेत्र यांचा समन्वय असावा.

7) माहितींच्या प्रणालीचे संगणकीकरण व्हावे.

## 2) सुक्ष्म सिंचन योजना

१) पिकांना पाणी देतांना पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे व कमी पाण्यामध्ये जास्त सिंचन व किमान पाणी वापर यासाठी ठिवक व तुषार सिंचन पध्दती शेतकऱ्यांना उपयुक्त व्हावी म्हणून शासनाने ही योजना प्रत्येक जिल्हासाठी सुरु केली आहे.

२) अल्प व अत्यल्प भूधारक मागासवर्गीय व माहिला शेतकऱ्यांना प्राधान्य क्रम देवून सिंचनाची सोय असलेल्या शेतकऱ्यांचा यात प्रामुख्याने सहभाग केला जातो. परंतू महिला लाभार्थींचे प्रमाण कमी आहे.

३) बहूभूधारक शेतकऱ्याना ठिबक/तुषार संच किमंतीच्या 50% किवा जास्तीत जास्त 7500 रु पर्यंत अनुदान तर अल्प व अत्यल्प भूधारकासाठी 60% किंवा 9000 रु पर्यंत अनुदान यातील किमान रक्कम अनुदानाच्या स्वरुपात दिली जाते.

४) शेतकऱ्या कडे सिंचनाची व्यवस्था असणाऱ्यांनाच अनुदान दिल्या जाते. त्या प्रमाणे एकूण 332 निवडलेल्या लाभार्थी पैकी सर्वाकडे सिंचन विहीरी अथवा विधंन विहीरीची सोय होती असे सर्व्हेक्षणातून दिसून आले. या व्यतिरिक्त काही गांवामध्ये लाभार्थी यादीतील आठ ते दहा लाभार्थी असे दिसुन आले की, त्यांचे लाभ घेतलेल्या यादीमध्ये नांव आहे मात्र प्रत्यक्षात या सर्वलाभार्थीनी योजनेचा लाभच घेतलेला नाही. असे लाभार्थ्यांनी सर्व्हेक्षणाअंती सांगीतले.

५) सर्व निवड केलेल्या 332 लाभार्थीकडे असलेल्या 334 सिंचन व विधन विहीरीच्या माध्यमातून एकूण 943.33 हेक्टर क्षेत्र भिजते त्यांची सरासरी 2.84 हेक्टर येते तर स्वतंत्रपणे ठिबक सिंचन खाली 177 शेतकऱ्यांची 3.17 हेक्टर जमीन भिजते तसेच एका तुषार संचा खाली सरासरी 2.46 हेक्टर जमीन पाण्याखाली वापरासाठी येते. सर्वात जास्त ठिबक सिंचनाखालील क्षेत्र अर्धापूर तालूक्यात असून तुषार सिंचनाखाली किनवट तालूक्यात सर्वात जास्त क्षेत्र निदर्शनास आले.

६) जमीन धारणे नुसार ठिबक व तुषार खालील 138 लाभार्थी अल्प व अत्यल्प असून त्याचे एकूण भिजणाऱ्या 943.33 हे. क्षेत्रा पैकी त्यांचे फ क्त 167.63 हे. (18%) क्षेत्र भिजते त्यांची सरासरी 1.22 हे. येते तर सर्वात मोठे शेतकरी 76 असून त्याचे लागवडी खालील क्षेत्र 487. हे (51 %) येते तर त्यांचे लागवडी खालील सरासरी क्षेत्र 6.40 हेक्टर येते.

७) 943 हेक्टर लागवडी खालील क्षेत्रापैकी 72 टक्के क्षेत्र (680 हेक्टर) बागायती आहे. ठिबक सिंचना खालील हे क्षेत्र सरासरी 2.30 हेक्टर येते तर तुषार खाली 1.75 हेक्टर बागायती क्षेत्र येते. अर्धापूर तालूका ठिबक सिंचनात अग्रेसर असून कंधार तालूक्याचे प्रमाण कमी आहे तसेच तुषार सिंचनाखाली किनवट तालूक्यास सर्वात जास्त लाभ होतो.

८) वास्तविक ठिबक असो अथवा तुषार सिंचनाची योजना बहूतेक सर्व संबंधित कंपन्याच शेतकऱ्यांचे प्रस्ताव मंजूर करुन घेतात. त्यामुळे शेतकऱ्यांना जास्त खर्च करावा लागत नाही. तरी परंतू अनूदानाची रक्कम 7500 रु ते 9000 रु पर्यंत असल्याने 1000 रु पेक्षा जास्तीचा खर्च शेतकऱ्यांना अयोग्य वाटतो असे फ क्त 10 टक्के शेतकरी आहेत. तरी परंतू 72 टक्के शेतक ऱ्यांना 750 रु पेक्षा जास्त खर्च आला नाही ही सुध्दा काही प्रमाणात जमेची बाजू आहे.

९) ठिबक अथवा तुषार सिंचनाच्या प्रशिक्षणाची गरज लक्षात घेवून शकतो कंपनीचे डीलर अथवा कंपनी तर्फेच प्रशिक्षण दिल्या जाते. कंपनी अथवा प्रशिक्षण मिळालेले 71 टक्के शेतकरी आहेत. कृषी विभागा तर्फे फ क्त 16 टक्के शेतकऱ्यांनाच प्रशिक्षण दिलेले आहे. प्रशिक्षणामुळे योजनेच्या संचाचा वापर व्यवस्थित केला जातो असे दिसून आले.

१०) ठिबक अथवा तुषार सिंचनाची योजना पिक निहाय राबविली जाते. त्यामुळे असे दिसून येते की सर्वात जास्त शेतकरी (38 टक्के) ठिबक सिंचनाचा वापर उसासाठी करतात तर सर्वात जास्त 52 टक्के शेतकरी तुषार सिंचनाचा वापर कापूस या पिकासाठी करतात. असे दिसते

## क्षेत्रिय पहाणीतील निरीक्षणे व शिफारशी

**आ) त्रुटी-**

1- वैजापुर पारडी ता. मुदखेड येथील लाभार्थी यादीतील एका लाभार्थीने या योजनेचा लाभच घेतला नसल्याचे दिसुन आले. त्यांच्या सोबत चर्चा केली असता त्यांनी योजनेचा लाभच मिळाला नसल्याचे स्पष्ट झाले.

2- बेट मोगरा ता. मुखेड येथे मूल्यमापन समितीने लाभार्थींची चौकशी केली असता मुल्यमापनात समितीला तीन लाभार्थी यादी मध्ये नसल्याचे दिसुन आले. त्यांच्याकडे विहिर /बोअर सिंचनाची साधने नसतांनाही त्यांची नांवे लाभार्थींच्या यादीत दिसुन आली आहे. त्याबद्दल विचार करणे गरजेचे वाटते.

3- अनेक लाभार्थी शेतक-यांनी ठिंबक/ तुषार संच क्षेत्रीय पहाणीच्या वेळेस काढून ठेवल्याचे आढळले. प्रत्यक्षात कुठे ठेवले ते दिसले नाही. तरी परंतु त्याचा वापर ठराविक काळात (रब्बी व उन्हाळी) पिकांसाठी करतात असे त्यांचे म्हणणे आहे. प्रत्यक्ष भेटीत घरी सुध्दा आढळून आले नाहीत.

**अडचणी-**

1. शासनाकडून मिळणारी सबसिडी लवकर मिळत नाही. शेतक-यांच्या नावांवर ती जमा केली जात नाही.
2. संच मिळविण्यासाठी काही रक्कम द्यावी लागते.
3. अनेक वेळा रानडुकरे पाईप लाईन उखडून टाकतात त्यामूळे ठिंबक संचाचे नुकसान होते. नुकसान भरपाई साठी विमा संरक्षण असावे अशी मागणी अनेक शेतक-यांनी केली आहे.
4. वितरण कंपन्यांच्या संचाच्या सुटया भागांची दरसुची या बाबत स्पष्टता नाही.

## क) शिफारशी

1. ठिंबक /सिंचन योजना शेतक-यांसाठी फलदायी असुन सबसिडी ची मर्यादा 75% पर्यंत वाढवावी.
2. सबसिडीची रक्कम लाभार्थीना त्वरीत दिली जावी.
3. सबसिडीची रक्कम शेतक-यांच्या नांवे बँकेत जमा व्हावी.
4. ठिंबक व तुषार संच दुरुस्तीसाठी निधी दिला जावा.
5. ठिंबक सिंचन नळयांची लांबी वाढवावी.
6. कंपनी तर्फे ज्या नळया दिल्या जातात त्या हलक्या स्वरुपाच्या असतात. त्या लवकर खराब होतात त्यांचा दर्जा सुधारला जावा.
7. शेतक-यांना ठिंबक व तुषार संच वापरण्याबाबत तांत्रिक प्रशिक्षण दिले जावे.
8. ठिबंक व तुषार संच निकामी अथवा अपेक्षित लाभ देत नसल्यास नुकसानी◌ाबाबत कंपनीनी विमा द्यावा.

## चांगल्या बाबी-

1. हदगांव, मुदखेड, किनवट या तालुक्यातील जास्तीत जास्त शेतक-यांनी ठिबंक व तुषार योजनेचा लाभ घेतल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कमी पाण्यामध्ये सिंचन क्षेत्रात चांगली वाढ झाली. ही या योजनेच्या दृष्टीने समाधारकारक बाब आहे.
2. तुषार/ ठिंबक सिंचन योजनेविषयी लाभार्थी समाधानी दिसले. कारण उत्पन्न वाढले. श्रम व लेबर वर्क कमी झाले. पर्यायाने मजुरीचा पैसा व वेळ वाचला. व पाण्याची बचत मोठया प्रमाणात झाली.
3. तुषार/ ठिंबक सिंचनामुळे लाभार्थीच्या उत्पादनात वाढ झाल्याची अनेक शेतक-यांनी प्रत्यक्षात भेटी मध्ये सांगितले.

## इंदिरा आवास योजना

१) घरकुलांची मागणी मागील तीन वर्षापासून दरवर्षी वाढत आहे. त्यामुळे दरवर्षीच्या घरकूल मंजूरीची टक्केवारी क्रमा-क्रमाने वाढत आहे असे दिसून येते.

२) 98% लाभार्थींची इंदिरा आवास योजने साठी निवड ग्रामसभेद्वारा झालेली आहे तर इतर 8 लाभार्थीची निवड पदाधिकाऱ्याकडून झालेली आहे. जास्त लाभार्थी हे मुखेड तालूक्यातील आहेत.

३) 78 % इंदिरा आवास घरकूलांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. 15% घरकूलाचे काम अपूर्ण आहे तर 7% घरकूलांचे बांधकाम अद्याप सुरुच झालेले नाही. अर्धापूर तालुक्या मध्ये सर्वात जास्त 24 पैकी 17 लाभार्थीने घराचे बांधकाम सुरुच केलेले नाही कारण मिंमासा केली असता त्यांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही तर चार तालुक्यातील इतर 8 लाभार्थी गावात राहात नाही.

४) ठराविक अनुदानाच्या निधी अंतर्गत ठराविक चटई क्षेत्रापूरते बांधकाम दारिद्र्य रेषे खालील लाभार्थीसाठी अपेक्षित असतांना बऱ्याच लाभार्थीने जास्त चटई क्षेत्र वापरुन व स्वतःच्या पैशाचा वापर करुन घरकुलांचे बांधकाम केलेले आहे. त्यामुळे खर्चात खूप वाढ झाली आहे. तर बरीच घरकूलं बांधकामे अपूर्णच राहीलेली आहेत.

५) लाभार्थीने घर बांधण्यासाठी केलेल्या खर्चाचा तपशील पाहिल्यास जवळपास 14 लाभार्थीने 1 लाखा पेक्षा जास्त खर्च केलेला आहे त्यामुळे निवड झालेले लाभार्थी हे खरोखरच दारिद्र्य रेषे खाली आहेत का या बाबत शंका वाटते. कारण एवढया घरासाठी खर्च करणारे लाभार्थी दारिद्र्य रेषे खाली येवू शक त नाही शिवाय या लाभार्थींनी हा खर्च स्वतःच्या उत्पन्नातून केला आहे असे स्पष्ट केले आहे.

६) 63 टक्के लाभर्थींना घरकूलासाठी शासना कडून पूर्ण अनुदान रक्कम 68500 रु मिळाले आहे. तर इतर लाभार्थींना काही कारणास्तव पूर्ण रक्कम मिळाली नाही.

७) 50 % लाभार्थींचे घरकूलाचे बांधकाम चांगले आहे. कदाचित कमी बजेट मुळे त्यांना उत्तम गुणवत्ता टिकवता आली नाही असे दिसते.

८) घरकूलासाठी शासना तर्फे लाभार्थीला अपेक्षित असणाऱ्या सोईबाबत तपासणी केली असता निरधुर चुल जवळपास 80 टक्के लाभार्थींना मिळाली नाही. तर 98 टक्के लाभार्थींच्या घरकूलांवर इंदिरा आवास योजनेचा लोगो नाही. शौचालय व विदयुत पुरवठया बाबत सुध्दा काही लाभार्थी या सोई पासून वंचित आहेत.

## क्षेत्रिय पहाणीतील निरीक्षणे व शिफारशी

### त्रुटी-

१) लाभार्थ्यांना समान रक्कम मंजुर व समान निधी वाटप धोरण नाही. लाभार्थींना समान रकमेने पहिल्या हप्त्याचे वाटप झालेले नाही.

२) एकुण 253 बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांपैकी 161 (64%) लाभार्थ्यांकडे शौचालय सुविधा आहे. परंतू त्यातील 63 लाभार्थी (39%) शौचालयाचा वापरच करीत नाहीत. असे दिसुन आले आहे.

३) बांधकाम पुर्ण केलेल्या एकुण 253 लाभार्थ्यांपैकी 92 लाभार्थ्यांकडे शौचालयाची सुविधा नाही. त्याची टक्केवारी 36 टक्के आहे. या बाबींकडे संबंधित यंत्रनेणे दुर्लक्ष केल्याचे जाणवते.

४) एकुण 253 पैकी 248 लाभार्थ्यांच्या घरावर इंदिरा आवास योजनेचा लोगो नाही. त्याचे प्रमाण 98 टक्के आहे. कारण प्रत्यक्षात पुर्ण झालेले घर हे कोणत्या योजनेतून बांधलेले आहे हे समजत नाही. ही बाब गंभीर असून लोगो असल्याशिवाय पूर्णत्वाचा दाखला देवू नये.

५) एकुण 253 लाभार्थ्यांपैकी आजही 71 लाभार्थीकडे विदयुत पुरवठा करण्यांत आलेला नाही. त्यांची टक्केवारी 28 टक्के अशी आहे.

६) जवळपास 34 लाभार्थींना (साधारण 10%) निधीचा हप्ता मिळविण्यासाठी संबंधित कर्मचारी व अभियंता यांनी काही प्रमाणात रकमेची मागणी केल्याचे निदर्शनास आले.

७) ब-याच लाभार्थ्यांच्या घरकामाचा खर्च हा मंजुर रकमपेक्षा दोन ते तीन पटीने अधिक आहे.

८) एकुण 253 लाभार्थी पैकी 127 लाभार्थींची (50%) घराच्या बांधकामाची गुणवत्ता साधारण श्रेणीमध्ये दिसुन आली.

९) एकुण भेट दिलेल्या 325 लाभार्थ्यांपैकी 48 लाभार्थींच्या बांधकामाची स्थिती अपुर्ण व बंद स्थितीमध्ये आहे त्याची टक्केवारी 14% अशी आहे तर 24 लाभार्थींनी घराचे अद्याप बांधकामच केले नसल्याचे दिसुन आले आहे. त्याची टक्केवारी 7% आहे.

वरील सर्व क्षेत्रीय निरिक्षणाची संबधित यंत्रणेने गंभीर दखल घेऊन त्या त्रुटी दुर करण्यांच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करुन अमंलबजावणी करावी असे सुचवावे वाटते.

## अडचणी

१) लाभार्थींना घरकुलासाठी मंजुर असलेली अनुदानाची रक्कम ही अतिशय कमी आहे. त्यामूळे घराचे बांधकाम पूर्ण करता येत नाही काम पुर्ण करावयाचे झाल्यास कर्ज काढावे लागते. म्हणून निधी वाढवून मिळावा अशी सुचना सर्वच लाभार्थींनी केली आहे

२) निधी वितरीत करतांना सर्वांना सारख्या रकमेने निधी दिला जात नाही त्यामूळे आर्थिक अडचण निर्माण होते.

३) घराचे हप्ते (निधी) मिळविण्यासाठी काही कर्मचारी पैशाची मागणी करतात. आधीच लाभार्थ्यांची परिस्थिती गरीबीची असल्या कारणाने पैसे देवू शकत नाही. त्यामूळे आर्थिक अडचण निर्माण होते.

## शिफारशी

१) लाभार्थींचे घराचे बांधकाम सुरु असतांना बांधकाम स्थितीचा आढावा संबंधित यंत्रणेने नियमित घेण्याची गरज आहे.

२) घरकुलासाठी अनुदानासोबतच बीपीएलसाठी किमान 50 टक्के कर्जाची व्यवस्था बँकानी करावी. अशी मागणी केली जात आहे.

३) लाभार्थींकडे जागा उपलब्ध असल्याशिवाय व त्यांची खात्री झाल्याशिवाय घरकुलास मंजुरी देवू नये.

४) प्रत्येक लाभार्थींच्या घरावर इंदिरा आवास योजनेचा लोगो असायलाच हवा. (लोगो ही योजनेची समजण्यांची खुण आहे. ही महत्वाची बाब असतांना संबंधित यंत्रणेने याकडे दुर्लेक्ष का केले याची  वरीष्ठ अधिका-यांनी नोंद घेण्यांची गरज आहे.

५) लाभार्थींच्या घरामध्ये विदयुत पुरवठा करतांना शासनाने ठरवून दिलेले नियम व निकषाची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

६) लाभार्थ्यांना घराचा शेवटचा हप्ता देतांना लाभार्थींने घरासंबधी सर्व बाबींची पूर्तता केली आहे का? हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः शौचालयाची सुविधा व त्याचा वापर ही बाब कटाक्षाने पाहण्यांत यावी. याशिवाय अंतीम हप्ता देण्यांत येवू नये. व पूर्णत्वाचे प्रमाणपत्रही देवू नये.

७) ज्या लाभार्थींनी घराची रक्कम उचलेली आहे. व घरकुलाचे बांधकाम केले नाही अशा सर्व लाभार्थींवर कायदेशीर कार्यवाही व्हावी व तो उचललेला निधी वसूल करावा.

८) लाभार्थींच्या घरकुलाची मंजुरी देतांना त्यांचे वास्तव्य कायम स्वरुपी गावात आहे किंवा नाही याची खातरजमा संबंधित यंत्रणेने करावी. या बाबतीत संरपच यांना लाभार्थींच्या कायम वास्तव्या बाबत जबाबदाऱ्या व त्यानंतरच त्याची घरकुलाची निवड करुन रक्कम मंजुर करावी.

९) मुल्यमापन पहाणीमध्ये 21 टक्के लाभार्थींच्या घरांचे बांधकाम अपूर्ण /बंद व काम केलेले नाही असे दिसते आहे. याचाच अर्थ याकडे संबधित यंत्रणेने नियमित पाठपुरावा केलेला दिसत नाही. इथे यंत्रणा कमी पडते असे स्पष्टपणे दिसुन येते त्यामध्ये सुधारणा व्हावी. जेणे करुन पून्हा असे प्रश्न निर्माण होणार नाहीत.

**चांगल्या बाबी-**

१) बहुतेक सर्व लाभार्थींना घरकुलाचा निधी वेळेवर प्राप्त झाला आहे.

२) काही अपवाद वगळता सर्व लाभार्थ्यांची निवड ही ग्रामसभेव्दारा व प्रतिक्षा यादीतूनच झाल्याचे दिसुन येते.

३) भेट दिलेल्या 325 लाभार्थींपैकी 253 लाभार्थींनी आपले घरकुलाचे काम पूर्ण केले आहे.

४) सर्व लाभार्थींना निधीचे वितरण बँकेमार्फतच करण्यांत आले आहे.

५) घराचे बांधकाम लाभार्थी यांनी स्वतःच्या श्रमदानातून व मिस्त्रीची मदत घेऊन पूर्ण केले आहे. यामध्ये कुठेच गुत्तेदार सामील नाहीत. या चांगल्या बाबी आहेत.

- **काही महत्वाच्या बाबी**

१) प्रतिक्षा यादीनुसार घरकुल मिळत नसल्याची तक्रार कंधार तालुक्यातील एका लाभार्थींनी केली आहे.

२) वायफना खु. तालुका हदगांव येथील लाभार्थींने घरांचे बांधकाम पूर्ण करुनही त्यांना संपूर्ण रक्कम मिळाली नसल्याची लाभार्थ्यांनी तक्रार केली आहे.

३) एकुण पाच तालुक्यातुन 325 लाभार्थीपैकी 24 लाभार्थींनी आपल्या घराचे बांधकाम केले नाही. बांधकाम न केलेल्या लाभार्थीमध्ये सर्वात जास्त संख्या 17 अर्धापुर तालुक्यातील आहे. कारणांचा विचार करता या लाभार्थींकडे घरासाठी जागा उपलब्ध नसल्याल्याचे स्पष्ट झाले आहे. इतर चार तालुक्यात देखील आठ लाभार्थींनी सुध्दा घराचे बांधकाम केलेले नाही. कारणांचा विचार करता हे सर्व लाभार्थी परगांवी

वास्तव्यास आहेत. वरील कारणांचा विचार करता मंजुरीच्या वेळी संबधित कर्मचा-यांनी◌ी योग्य ती चौकशी न करता घरांना मंजुरी दिलेली आहे. हे स्पष्टपणे दिसुन येते.

## लघुपाटबंधारे योजना (सिमेंट नाला बांध व कोल्हापुर बंधारे)

१) लघुपाट बंधारे योजने अंतर्गत सिमेंट नाला बांधकाम योजना व कोल्हापूर बंधारे या योजनांचे मुल्यमापन करण्यात आले यामध्ये सिमे◌ेंट नाला बांधकाम योजनाचे निष्क र्ष खालील प्रमाणे आहेत.

२) नांदेड जिल्हयातील निवडक 5 तालूक्यातून 38 सिमेंट नाला बांधकामाची पाहणी केली व त्या अतंर्गत प्रत्येकी पाच लाभार्थीची मुलाखती घेवून एकूण 222 लाभार्थीचे या योजने बाबतचे मनोगत जाणून घेतले तसेच काही बांधकामाची प्रत्यक्ष तांत्रिक मोजमाप घेवून तपासणी केली यासर्व बाबीचा निष्क र्ष खालील प्रमाणे आहे.

३) सिमेंट नाला बांधकाम निवडतांना जागेची योग्य निवड असणे अवश्यक असते त्याच प्रमाणे त्याखालील किती विहीरीना लाभ होईल हे पाहणे गरजेचे असल्यामूळे किती शेतकरी अथवा किती विहीरींच्या पाणी पातळीत वाढ झाली या सदर्भात तक्ता क्र. 4.4.1 मध्ये माहिती दर्शविली आहे. एकूण निवडलेल्या 38 सिमेंट नाला बांध अतंर्गत 93 सिंचन विहीरी व 43 विधन विहीरी अस्तित्वात होत्या व त्याखाली 222 शेतकऱ्यांना लाभ अपेक्षित होता. त्यामुळे प्रत्येक सि. ना. बाधकामा अंतर्गत साधारण पणे सरासरी 3 ते 4 विहीरीचा व 5 ते 6 शेतकऱ्यांचा समावेश होतो. अर्धापूर तालूक्यात सर्वात कमी लाभार्थी असूनही सर्वात जास्त विहीरीची संख्या मुखेड मध्ये येते.

४) पाटबंधारे योजनाचा लाभ शेतकऱ्यांना काय झाला याची पाहणी करताना असे दिसून येते की 222 लाभार्थीची प्रकल्पापूर्वी 470 हेक्टर जमीन लागवडी खाली होती. व प्रकल्पानंतर 517.75 हेक्टर जमीन लागवडी खाली आली. म्हणजेच 47.65 हेक्टर (10%) जास्तीची जमीन लागवडी

खाली आली यात सर्वात जास्त प्रमाण अर्धापूर तालूक्याचे आहे. तसेच प्रत्येक सिमेंट नाला बांध मागे सरासरी 1.25 हेक्टर जमीन लागवडी खाली आली व त्यामुळे याचा बऱ्याच शेतकऱ्यांना फ ायदा झाला.

५) पाण्याची उपलब्धता झाल्यास बागायती क्षेत्रात वाढ होणे अपेक्षीत आहे. सिमेंट नाला बांध मुळे यात काय बदल झाले याचा अभ्यास करतांना असे स्पष्ट होते की जवळपास बागायती क्षेत्रात 19 टक्यांनी वाढ झाली. तसेच पूर्वी पेक्षा 14 लाभार्थीची बागायती शेती सुरु केली म्हणजे त्यांच्या सिंचनात 12 टक्यांनी वाढ झाली. सर्वात जास्त किनवट या अदिवासी तालूक्यात ही वाढ झाल्याची दिसते. तसेच बागायती क्षेत्रात 109 टक्के ने वाढ झाली यात योजनेचे यश समावलेले आहे असे जाणवते.

६) पिक वार लागवडी खालील क्षेत्र व उत्पादन व उत्पादकते बाबत विचार करताना असे दिसून येते की 38 सिंमेट नाला बांध अंतर्गत वर उल्लेखलेल्या तिन्ही बाबतीत सकारात्मक परिणाम दिसून येतात एकूण मुख्य पिकाखलील क्षेत्रात 5 टक्के एकूण उत्पादनात 10 टक्के तर उत्पादकतेत 4 टक्के वाढ झालेली आहे. पिकवार बदल लक्षात घेतल्यास सोयाबीन, कापुस, तुर व हरबरा यांच्या क्षेत्रात चांगली वाढ झाली तसेच गव्हाच्या व हरभरा क्षेत्रात जरी फार वाढ झाली नाही तरी त्याच्या उत्पन्नात अनुक्रमे (145%) व उत्पादकतेत (141%) चांगली वाढ झाली आहे तसेच हरभऱ्याच्या क्षेत्रात व उत्पन्नातही बरीच वाढ झाल्याचे दिसून येते व या रब्बीतील पिकांना सिंमेट नाला बाध योजने मुळे फायदा झाला असे स्पष्ट होते.

७) बियाणे व रासायनिक खताच्या वापरा संबधी असे दिसून येते की जास्तीत जास्त शेतकरी सुधारित बियाणाचा वापर करतात तर रासायनिक खताचा वापर ही होत असून पारंपारिक व रासानिक दोन्ही खताचा वापर शेतकऱ्यांनी जास्त प्रमाणत सुरु केलेला आहे.

८) सर्वसाधारणपणे गुंतवणूकीचा अंदाज घेतांना शेतकऱ्यांना प्राधान्यक्रमाने पशुधनाची जास्त गरज असते. त्यामुळे आलेल्या उत्पन्नातून लाभार्थीनी जास्तीची जनावरे खरेदीमध्ये गुंतवणुक केलेली आहे असे दिसते. 222 लाभार्थी पैकी जवळ पास 43 % लाभार्थीनी जनावरे खरेदीमध्ये गुंतवणूक

केल्याचे दिसत आहे. या मध्ये शेळी खरेदीची जास्त संख्या असून या लाभार्थी पैकी कोणी गाय अथवा बैल तर कोणी म्हैस असे एक किंवा दोन जनावरे खरेदी केल्याचे दिसुन येते. म्हणजे बऱ्याचशा लाभार्थींनी आपल्यात सुधारणा करुन घेतल्याचे जाणवते.

९) लाभार्थींच्या गुंतवणूकी बरोबरच त्यांच्या उत्पान्नात व खर्चात वाढ झाल्याचे ही अभ्यासावरुन दिसून येते आहे. एकूण 222 लाभार्थी पैकी 51% लाभार्थींच्या उत्पन्नात वाढझाली त्यातील 5 ते 10 टक्के पर्यत उत्पन्नात वाढ झाल्याचे प्रमाण 45 % आहे तर 10 % जास्त वाढ झालेले लाभार्थी 30% आहेत. खर्चाच्या बाबतीत यात 40% लाभार्थींचा खर्च फ क्त 5% ने वाढला तर 36% लाभार्थींचा खर्च 5 ते 10% पर्यंत वाढला आहे. या वरुन हेही स्पष्ट होते की लाभार्थींच्या उत्पन्नात वाढ ही तेवढया प्रमाणात खर्ची पडली नाही तर त्याचा वाढीव उत्पन्नाच्या गुंतवणूकीसाठी वापर केला आहे.

१०) एकंदरीत या योजनेची फलश्रुती सांगताना हे स्पष्ट होते की सिमेंट नाला बांध कामाच्या तांत्रिक बाबीचा व काही निकृष्ट कामाचा भाग सोडला तर अस्तित्वात असणारे सिंमेट नाला बांध शेतकऱ्यांना उपयुक्त आहेत व त्यांचा विकासासाठी चांगला फायदा होतो.

**क्षेत्रिय पहाणीतील निरीक्षणे व शिफारशी-**

**<u>कंधार तालुका-</u>**

**दहिकळंबा -** 2011-12 चा हा बंधारा आहे. बंधा-याचे बांधकाम सर्वसाधारण आहे. यावर्षी पाऊस पडल्यावर पाणी साठल्यावर त्याचा परिणाम दिसेल.

**रुई -** नविन बंधारा, आहे. बांधकाम सर्वसाधारण, आहे. सध्या लाभ होत नाही, कारण पाऊस पडल्यावर पाणी बंधाऱ्यात साचल्यावर त्याचे परिणाम दिसु लागतील.

**मानसिंगवाडी -** चांगला आऊटपुट आहे. 2009-10 चा हा बंधारा आहे. शेतक-यांच्या विहिरीची पाणी पातळी वाढली आहे. व सिंचनक्षेत्र वाढले आहे असे प्रत्यक्षात मुलाखतीत शेतक-यांनी सांगितले.

**बाळंतवाडी -** चांगल्या गुणवत्तेचे बांधकाम आहे. जिल्हा परिषद सदस्याच्या शेतीमध्ये हा बंधारा आहे, विहिरीच्या पाणी पातळीमध्ये 5 ते 6 फुटापर्यंत या बंधाऱ्यामुळे चांगली वाढ झाली आहे.

११) मुखेड तालुकाः- 2011-12 चे बांधकाम आहे. या वर्षी आऊटपुट नाही, पाऊस पडल्यावर व पाणी पातळी वाढल्यावरच परिणाम दिसतील.बांधाऱ्याचे बांधकाम सर्वसाधारण आहे

१२) अर्धापुर- उमा नदीवर बांधलेला हा बंधारा आहे. वरती इसापुर धरण असल्यामूळे काही वेळा सांडव्यातून पाणी सोडल्यास बंधा-यामध्ये पाणी साचते व शेतक-यांना पाणी पिकांसाठी मिळते. बंधा-याच्या बाजुला शेती नाही. गायरानामध्ये हा बंधारा बांधलेला आहे. चांगला आऊटपुट आहे. पाणी साचलेल्या बंधा-यामध्ये मोटारी टाकुन उपसा करुन पिकासाठी पाणी दिले जाते.

## ➢ सिमेट नाला बांध - अन्वेषकांचा अभिप्राय

१) काही नविन बंधारे 2011-12 चे असल्यामूळे या वर्षी पाऊस पडल्यावर त्यांचा परिणाम दिसेल.

२) बांधकाम काही ठिकाणचे सर्वसाधारण आहे. क्युरिंग करणे अपेक्षित होते ते झालेले नाही सिमेंटचा वापर कमी  केला गेला आहे.

३) रबरसिल निकामी झाल्यामूळे पाणी पाझरते, चांगल्या गुणवत्तेचे रबरसिल आवश्यक आहेत. फायबर गेटचा वापर होणे आवश्यक आहे कारण हाताळणी करणे सोपे जाईल.

४) काही बंधारे चांगले परिणामकारक आहेत. तरीही गाळ काढणे आवश्यक आहे, उपभोक्ता गटांची निर्मीती आवश्यक आहे व, देखभाल दुरुस्ती आवश्यक आहे.

५) काही लिकेजेस काढणे आवश्यक आहेत.

६) काही प्रमाणात जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी सि.ना.बा. चा चांगला उपयोग झाल्याचे दिसले.

७) पाणी पातळी वाढल्यामूळे शेतक-यास चांगली मदत झाली असल्याचे दिसते.

८) इसापुर धरणातून सांडवा येवून सी.ना.बांध मध्ये पाणी साचते. त्यामूळे मोटार टाकून शेतकरी शेतीला पाणी देतात.

९) तामसा ता. हदगांव येथील बंधारा निकृष्ट दर्जाचा असून, नुसतेच दगड वापरलेले आहेत. सिमेंटचा खुपच कमी वापर आहे.

१०) सिमेंटचा पूर्णपणे वापर आवश्यक आहे. दगडाचा वापर टाळावा. अंदाजपत्रका प्रमाणेच साहित्य वापरावे.

११) काही बंधारे फुटलेले- तुटलेले, डॅमेज झालेले आहेत. त्याची दुरुस्ती आवश्यक आहे.

१२) क्रॅक केलेल्या बंधा-यात पाणी थांबत नाही.

१३) काही सि.ना.बांध व्दारयुक्त आहेत. त्यांना दरवाजे बसविलेले नाहीत ते गेट बसविणे आवश्यक आहे.

१४) काही ठिकाणचे सिमेंट बंधारे व्दार नसलेले आहेत त्यांचाही चांगला परिणाम दिसुन येत आहे.

१५) काही गेट सरपंचाच्या घरी असल्याचे निदर्शनास आले ते प्रत्यक्षात स्पॉटवर असणे आवश्यक आहे.

१६) काही सि.ना.बां. चे साईट सलेक्शनच चुकीचे असल्याचे दिसले. त्यामूळे पाणी साठा पाहिजे तेवढा होत नाही.

१७) काही सिमेंट नाला बंधा-याचे बांधकाम उत्कृष्ट आहेत तर मांडवी, तामसा या शिवारातील निकृष्ट सिमेंट नाला बंधारे सुध्दा दिसले.

१८) बंधा-यामूळे विहीरींची पाणी पातळी वाढलेली असून सिंचन क्षेत्रामध्ये लक्षणिय वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे अर्धापुर तालुक्यास चांगला फायदा झाला असल्याचे जाणवले.

१९) शक्यतो कामे ग्रामपंचातीने केली आहेत टक्केवारी देण्यामध्ये बराच निधी जातो असे कंत्राटदाराचे म्हणणे आहे.

२०) माथा ते पायथा या संकल्पनेतून काम होणे गरजेचे आहे. वरुन उपचार नसल्यामुळे संपूर्ण पाण्याचा दाब सिमेंट बंधा-यावर येवून बंधाऱ्यास तडे गेलेले दिसतात.

२१) सिमेंट नाला बांध व कोल्हापुरी पाटबंधारे साठी कुशल गवंडी व कामगार असणे आवश्यक आहे. त्यामुळे काम सफाईदार पणे होईल. ब-याच ठिकाणी कामे ओबड-धोबड झालेली दिसतात. बांधकामात गुणवत्ता टिकवून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

**अंगणवाडी योजना-**

१) आंगणवाडी मुल्यमापनासाठी एकुण पाच तालुक्यातुन 72 अंगणवाडीची निवड करण्यांत आली. प्रत्यक्ष क्षेत्रीय तपासणीच्या वेळी संबंधीत शाखा अभियंता यांनी अंगणवाडीबाबत मंजुरी, त्याचा कार्यकाळ, खर्च, प्राप्त निधी, अहवाल व अंदाजपत्रकाबाबत माहिती दिलेली आहे.

२) 72 आंगणवाडयापैकी 62% (45 अंगणवाडया) व 39% (22 अंगणवाडया) सन 2011-12 मध्ये मंजुर करण्यांत आल्या. 75% अंगणवाडी सेविकाची निवड, जिल्हा निवड समिती व्दारे केली तर उर्वरीत अंगणवाडी सेविकेची जिल्हा परिषदेतर्फे करण्यांत आली. तसेच 72 आंगणवाडी पैकी 36 आंगणवाडी सेविका (50%) ची नेमणुक 5 वर्षापुर्वीची होती. तर 24 (33%) अंगणवाडी सेविकेची नेमणुक 1 ते 3 वर्षाच्या कालावधीत झाली आहे. त्यामूळे अंगणवाडयांचा कार्यक्रम 1 ते 3 वर्षापासुन नियमितपणे कार्यान्वित आहे असे दिसते.

३) एकुण निवडलेल्या 72 आंगणवाडीपैकी फक्त 23 अंगणवाडीचे (32%) बांधकाम पूर्ण झालेले आहे. तर पुढील 15 अंगणवाडया (22%) प्रगती पथावर आहे. परंतु एकुण 34 आंगणवाडी बांधकामाची स्थिती पहाता 20% अंगणवाडी चे बांधकाम सुरु झालेच नाही तर 26% अंगणवाडीची बांधकामे अपुर्ण असुन बंद आहे. त्यामूळे फार थोडया (32%) अंगणवाडीतील बालकांना इमारतीचा लाभ होतो तर इतर सर्व अंगणवाडया खाजगी इमारतीत, शाळेच्या इमारतीत अथवा इतरत्र भरतात.

४) एकुण निवडलेल्या 72 अंगणवाडी बांधकामासाठी पाच तालुक्यातून रु. 237.55 लाख निधी मंजुर करण्यांत आला होता त्यापैकी रु.161.65 लाख निधी मिळाला व तेवढाच निधी 100% खर्च करण्यांत आला. या संदर्भात अंगणवाडी खर्चाचे 68 टक्के प्रमाण येते, तर शिल्लक 32% रक्कम अजुन पर्यंत राहिलेल्या सर्व अंगणवाडयांना मिळालेली नाही. त्यामूळे ब-याच अंगणवाडयाचे बांधकाम अपूर्ण राहिलेले आहे. एकुण अंगणवाडी पैकी जवळपास 49 अंगणवाडयांचे बांधकाम अपूर्ण आहेत तर अनेक ठिकाणी बांधकाम सुरुच झालेले नाही. त्यांची कारणे शोधली असता यातील 19 अंगणवाडयांचे

निधीअभावी, व ग्रामपंचायतींची उदासीनता यामूळे अपुर्ण वा बंद स्थितीत आहे. तर 15 अंगणवाडयाचे काम चालुच आहे. त्यामूळे जवळपास 2/3 अंगणवाडीची कामे पूर्ण झालेली नाही.

एकंदरीत अपूर्ण राहिलेल्या अंगणवाडी खर्चाचा तपशील पहाता 32 अंगणवाडयांवर (65%) रु. 3 ते 5 लाख पर्यंत खर्च केलेला असुनसुध्दा त्या अंगणवाडयाचे बांधकाम अपुर्णच आहे तर 18 आंगणवाडयांचा खर्च रु. 2.5 लक्ष ते रु.3.00 लाख होऊन अजुन बरीचशी कामे अर्धवट परिस्थितीत आहे. याबाबत काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. पुर्ण बांधकाम झालेल्या अंगणवाडीची प्रत्यक्ष गुणवत्ता तपासली असता 6 (26%) अंगणवाडीचे बांधकाम उत्कृष्ट प्रकारचे आढळले तर (16) आंगणवडयाचे 69% बांधकाम सर्व साधारण ब-यापैकी होते. फक्त 1 आंगणवाडीचे काम हे निकृष्ट प्रतीचे होते हे पाहणीतून आढळुन आले.

## ➢ क्षेत्रिय पहाणीतील निरीक्षणे व शिफारशी-

### त्रुटी

१) काही ग्रामपंचातीकडे अंगणवाडी बांधकामासाठी जागा उपलब्ध नाही. जागेची शहानिशा न करताच अंगणवाडी बांधकामास मंजुरी दिली गेली. त्यामूळे आजपर्यंत 15 ठिकाणी अंगणवाडीचे बांधकाम होऊ शकलेले नाही.

२) निधी वेळेवर वितरीत न केल्यामूळे अनेक ठिकाणी अंगणवाडी बांधकामे अर्धवट स्थितीत आहे. निधी वितरीत करण्यांमध्ये सू-सुत्रता व तत्परता नाही. अनेक ठिकाणी ग्रामपंचायतीने बांधकाम करुनही त्यांना निधी वेळेवर वितरीत केलेला नाही.

३) निधीची रक्कम कमी असल्या कारणाने अनेक ग्रामपंचायतीने आंगणवाडीचे बांधकाम करण्यांस असमर्थतता दर्शविली आहे. शासनाकडून वाढीव निधी येणार याची ग्रामपंचायत वाट पाहत आहेत.

४) एकुण भेट दिलेल्या 72 अंगणवाडी पैकी केवळ 23 अंगणवाडीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. याचा विचार करता केवळ 32 टक्के बांधकाम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत 68 टक्के बांधकामांना गती देण्यांची गरज आहे.

५) अनेक ग्रामपंचायतींना निधी देऊनही बांधकाम करण्यांकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. कारण 8.25 टक्के रक्कम शासकीय वितरीत निधीतून रक्कम कपात केली आहे. बांधकामाची स्थिती व प्रगती पहाता बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टिने यंत्रणा कमी पडली. अंगणवाडीच्या बांधकामावर संबधित यंत्रणेचे सनियंत्रण व पाठपुरावा देखील कमी पडल्याचे यातून स्पष्टपणे दिसून येते.

६) अंगणवाडीची निवड असलेल्या काही ग्रामपंयतींनी गावाची गरज ओळखुन अंगणवाडीचे बांधकाम करण्यांसाठी उधार उसनवार रक्कम घेऊन बांधकामावर खर्च केली आहे. व काम पूर्ण केले आहे. व 3 ते 6 वयोगटातील मुले त्याचा लाभ घेत आहेत. परंतु अशा ग्रामपंचातीना निधी वितरीत न केल्यामूळे त्यांना आर्थिक अडचणींना समोर जावे लागत आहे. व त्यामूळे अशा ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी असमाधानी आहेत.

**अडचणी-**

१) ग्रामपंचायत स्तरावर उधार उसनवार रक्कम घेऊन बांधकाम पुर्ण केल्यावरही संबधित यंत्रणेकडून निधी वेळेवर मिळाला नाही. त्यामूळे आर्थिक समस्या निर्माण झालेली आहे.

२) बांधकामासाठी पहिला हप्ता अनामत रक्कम न दिल्यामूळे काम सुरु करण्यांस आर्थिक अडचण निर्माण होते.

३) काही गावांमध्ये पाणी टंचाई व मिस्त्रीची अडचण असल्या कारणाने अंगणवाडीचे बांधकाम करता आले नाही. असे सरपंचानी नमुद केले आहे.

४) बोधडी बु. ता. किनवट येथील अंगणवाडी बांधकामाची जागा अयोग्य ठिकाणी निवडली असून लहान बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ती योग्य नाही. कारण एक तर गावापासुन लांब व दुसरे कारण म्हणजे रेल्वे पटरी ओलांडून मुलांना अंगणवाडीमध्ये जाणे धोक्याचे आहे.

५) एकुण मंजुर रकमेतून 8.25 टक्के निधी रक्कम कपात केल्यामूळे अधिकच आर्थिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे अनेक ग्रामपंचातीनी बांधकाम करण्यांस असमर्थतता दर्शविली आहे.

६) बांधकाम करण्यांस ग्रामपंचायतीकडे जागाच नाही. व जागा विकत घेण्यांची तरतुद शासनाने केलेली नाही. त्यामूळे मोठी अडचण येत आहे. ग्रामसभेतून हा प्रश्न मार्गी लावण्याची गरज आहे.

**शिफारशी**

१) आंगणवाडी इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध असल्याशिवाय त्यास मंजुरी देण्यांत येवू नये. जागेच्या उपलब्धते बाबत स्वतः संबधित कर्मचारी/अधिकारी यांनी स्थळ पाहणी करुनच जागेबाबतची शहानिशा करावी. व या बाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिका-यावर टाकावी.

२) बांधकामासाठी निधी वितरीत करतांना त्यामध्ये तत्परता व सुसुत्रता असायला हवी की ज्यामूळे बांधकाम करणा-या यंत्रणेला आर्थिक अडचण येणार नाही. व कामे प्रलंबित राहणार नाही. ते बांधकामाच्या प्रगतीनुसारच बांधकाम करणा-या यंत्रणेला रक्कम दिली जावी.

३) मंजुर केलेल्या निधीतून 8.25 टक्के रक्कम कपात करण्यांत येवू नये. असे केल्यास कोणत्याही यंत्रणा बांधकामासाठी पूढे येणार नाही. असे प्रतिनिधिंचे म्हणणे आहे.

४) सध्याच्या महागाईचा विचार करता बांधकामसाठी दिली जाणारी रक्कम ही अपूर्ण आहे. त्याबाबत पूर्नविचार करण्यांची गरज आहे किंवा लोकवाटा 10% ते 20% पर्यंत निश्चित करावा.

५) बांधकाम पुर्ण करण्यास ग्रामपंचायतीला निश्चित कालावधी ठरवून देण्यांत यावा व त्या काळात काम न झाल्यास त्यांच्याकडील काम काढून घेऊन ते स्वतंत्र यंत्रणेला देण्यांत यावे.

६) इमारत बांधकाम चालु असतांना संबधित अधिकारी / कर्मचारी यांनी वेळोवेळी भेटी देऊन कामाच्या प्रगतीचा व स्थितीचा आढावा घेवून वरीष्ठांना अहवाल पाठवावा. त्यामूळे बांधकाम हे लवकर पूर्ण होऊन लाभार्थींना त्याचा लाभ लवकर मिळू शकतो. थोडक्यात जेवढी 50 कामे आज प्रलंबित राहीली आहेत ती नियमित पाठपुरावा केला असता तर ती मंजूर निधीतच पूर्ण होवु शकली असती.

७) जी कामे विविध कारणाने प्रलंबित राहीलेली आहेत. त्यावर संबधित अधिका-यांनी मार्ग काढुन काम पूर्ण कसे करुन घेता येईल याचे नियोजन करणे गरजेचे आहे.

८) बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीचा ताबा ग्रामपंचायतीने त्वरित अंगणवाडीला हस्तांतरीत केला पाहिजे. जेणे करुन लाभार्थींना सुविधा मिळु शकेल.

९) बांधकामाची जागा निवड करतांना लहान मुलांचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून आरोग्यदायी वातावरण असलेल्या ठिकाणची निवड करावयास पाहिजे.

१०) निधी घेऊनही अनेक ग्रामपंचातीनी बांधकाम केलेले नसेल तर अशा ग्रामपंचायतीवर कायदेशिर व दंडात्मक कार्यवाही करावी व एवढे करुनही प्रश्न सुटत नसतील तर पर्यायी व्यवस्था शोधावी.

**चांगल्या बाबी-**

१) बांधकाम पुर्ण झालेल्या सर्व अंगणवाडयांचे बांधकाम (काही ठिकाणी सोडता) समाधारकारक आहे.

२) मुखेड तालुक्यातील एका शेतक-यांने दोन अंगणवाडी बांधकामासाठी जागा दान देऊन गावांसाठी मोलाची मदत व सहकार्य केले आहे व गावासाठी एक आदर्श निर्माण केला आहे.

३) काही ग्रामपंचायतीच्या सरपंचानी अंगणवाडी बांधकामासाठी शासनाचा मंजुर निधी न मिळाल्याने स्वतःच्या हिंमतीवर अंगणवाडीचे बांधकाम एकही पैशाची उचल न घेता अंगणवाडीचे बांधकाम पुर्ण केले आहे.त्यांना निधी वितरीत करणे गरजेचे आहे.

**काही महत्वाच्या ठळक बाबी-**

- एका पार्डी खुर्द ता. किनवट अंगणवाडीत अंगणवाडी सेविका व मदतनिस या दोघीही मयत झाल्या असून तीन वर्षापासुन हे पद रिक्त आहे. गावक-यांनी अनेक वेळा पाठपुरावा करुनही हे पद भरण्यांबाबत प्रशासनाने दूर्लक्ष केले आहे. अंगणवाडी इमारत बांधकाम पूर्ण असुनही वरील कारणामुळे ताबा देण्यांत आलेला नाही. त्यामूळे बालकांची गैरसोय होत आहे.
- मौजे कौठा, ता. कंधार व मौजे शिरपुर ता. किनवट येथील आंगणवाडीचे बांधकाम केवळ ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामूळे होऊ शकलेले नाही.
- मुखेड तालुक्यामध्ये मंजुर झालेल्या एका आंगणवाडीचे बांधकामच रद्य करुन सदरील आंगणवाडी दुस-या ग्रामपंचायतीला वर्ग करण्यांत आलेली आहे.
- ग्रामपंचायत शनी ता. आर्धापुर येथील अंगणवाडी बांधकामासाठी जी जागा ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन दिली होती. त्या जागेवर कब्रस्थान भुमीचा वाद निर्माण झाला आहे. व तो वाद न मिटल्यामूळे अंगणवाडीचे बांधकाम सुरुच झाले नाहीत. याकडे संबंधित यंत्रणेने लक्ष देण्यांची गरज आहे.